**नोव्हेंबर २०००**

आज आम्हाला अत्यंत आनंद होत आहे की, ‘‘ पतसंस्था परिवार ’’ या सहकार क्षेत्रातील पतसंस्था या सहकार क्षेत्रातील अत्यंत अग्रणी अशा सहकार चळवळीतील पहिल्या मासिकाचा अंक आपल्या हाती देत आहोत. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ वाढावी, लोकांना तिचे महत्व पटावे, सहकारी चळवळीविषयी लोकांत जागृती व्हावी, इत्यादी बाबत परिपूर्ण माहिती व्हावी यासाठी आम्ही हा पत्रप्रपंच केला आहे.

आज सहकार चळवळीचा सोनियाचा दिन आहे. कारण आज १३ नोव्हेंबर म्हणजेच सहकाराचा महामेरु व महाराष्ट्रात सहकाराचा ज्यांनी कळस चढविला ते सहकार महर्षि वसंतदादा पाटील यांचा जन्मदिन आहे. बरोबर ७३ वर्षांपूर्वी या महाराष्ट्राच्या कर्मभूमीत सहकाराचा उध्दार करणाऱ्या, महाराष्ट्राचा विकास करणाऱ्या वसंतदादा पाटलांचा जन्म झाला होता. वसंतदादांना महाराष्ट्र कधीही विसरु शकणार नाही. सहकारातील प्रत्येक व्यक्ती आजचा दिवस विसरु शकणार नाही. त्या वसंतदादा पाटलांच्या चरनी आम्ही नतमस्तक होतो.

सहकार हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा आहे. सहकाराचा पाया वैकुंठभाई मेहता यांनी घातला. त्यांच्या या कार्यात गो. क. गोखले, विठ्ठलदास ठाकरसी, न. चिं. केळकर, जी. के. देवधर, चुनीलाल मेहता, द. गो. कर्वे, रमणभाई सरैय्या, वा. पु. वर्दे, विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकाराचा पाया घालण्याचे काम मजबूत केले. या पायावर सहकारमहर्षि वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण, शरदचंद्रजी पवार, बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, यशवंतराव मोहिते, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, आदि धुरीणांनी कळसच चढविला. आर्थिक मंदीच्या काळातही या संस्था टिकून राहाव्यात, संस्थांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे, दुर्बल गटाला अधिकाधिक साह्य करावे, आपल्या कामाचे विविधीकरण करावे यासाठी सहकारी संस्थांनी, पतसंस्थांनी, नागरी बँकांनी कोणकोणती उपाय योजना करावी, सहकार क्षेत्रातील अतिमहत्वपूर्ण विषयांवर विविध प्रकारची माहिती प्रसिध्द करणे, सरकारतर्फे वेळोवेळी सहकारासंबंधी जाहीर धोरण / जी. आर., सहकार कायद्यात होणारे बदल, सहकारी पतसंस्थांची माहिती, कार्यक्रम प्रसिध्दी व इतर माहिती आम्ही या ‘‘ पतसंस्था परिवार ’’ तर्फे सहकारातल्या व महाराष्ट्राच्या तळागाळातल्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविणार आहोत. हे मासिक आम्ही सहकार महर्षि वसंतदादा पाटील यांच्या जन्मदिनी म्हणजेच प्रत्येक महिन्याच्या १३ तारखेलाच प्रसिध्द करणार आहोत.

याकामी सहकारातील सर्वच खजिना वाचकांसाठी रिता करणार आहोत. तुमची आम्हाला प्रेमाची साथ हवी आहे. तुमच्या प्रत्येक अडचणीविषयी आम्ही तत्पर लेखनी हातात घेऊन तयार आहोत. तीलेखनी वाचकांसाठीच झिजविणार आहोत. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच उपयोगी पडेल असे सर्व विषय यात असतील. हे मासिक हाती घेताच आपण सहकारी खजिन्याने सुखावणार आहात. तेंव्हा तुमचेही सहकार्य आम्हाला हवे आहे.

‘‘ पतसंस्था परिवार ’’ हा आपला वाचकांचा, हितचिंतकांचा, जाहिरातदारांचा आहे. सहकार चळवळीसंदर्भात जे जे आवश्यक आहे ते ते देण्याचा आम्ही अटोकाट प्रयत्न करणारच. तेंव्हा ‘‘ पतसंस्था परिवार ’’ हा आपला म्हणून आम्हाला जरुर सहकार्य करावे ही विनंती.

म्हणूनच आम्ही महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचा कळस ज्यांनी चढविला त्या सहकार महर्षि वसंतदादा पाटील यांच्या जन्मदिनी म्हणजेच १३ नोव्हेंबर रोजी ‘‘ पतसंस्था परिवार ’’ चे प्रकाशन करण्याचे ठरविले आहे. आम्ही त्यांच्या आदर्शानुसार सहकार चळवळीसाठी नक्कीच आणखी चांगले प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. त्यात आपलेही सहकार्य हवेच!

एकमेकां साह्य करु ! अवघे धरु सुपंथ !

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!